# मुंबई विद्यापीठ

e-mail : arelection@election.mu.ac.in
Tel. No. : (022 )-68320017
(022 )-22696147

<u>अत्यंत तातडीचे/हस्ते बटवडा</u>

क.नि.वि./आयसीडी/२०१९-२०/४३५.

५ डिसेंबर, २०१९.

प्रति,
डॉ. विंदा मंजरमकर
बी. एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय,
ज्ञानद्वीप चेंदणी बंदर मार्ग,
ठाणे (प.)-४०० ६०१.

**विषय : अभ्यासमंडळावरील नामनिर्देशनाबाबत.**

महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, अधिष्ठाता मंडळाच्या दिनांक २७ मे, २०१९ रोजी झालेल्या सभेमधील बाब क्र. ३ च्या ठरावानुसार मा.कुलगुरूंनी अधिष्ठात्यांशी विचार विनिमय करून, **विस्तार कार्य (Extension Work)** या तदर्थ अभ्यास मंडळावर आपले नामनिर्देशन केले आहे. सदर अभ्यास मंडळावर झालेल्या नामनिर्देशनाबद्दल, विद्यापीठ प्रशासनातर्फे, हार्दिक अभिनंदन.

**विस्तार कार्य (Extension Work)** तदर्थ अभ्यास मंडळाच्या आपल्या सदस्यत्वाची मुदत तात्काळ प्रभावाने सुरू होऊन दिनांक ३१ ऑगस्ट, २०२२ पर्यंत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६३, ६४ आणि ६८ मधील तरतुदींच्या अधिन राहून असेल.

अभ्यास मंडळ हे महत्वाचे प्राधिकरण असल्याने, त्यात आपल्या सक्रीय सहभागाची, सहकार्याची आणि मार्गदर्शनाची अपेक्षा व्यक्त करतो.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६२, ६३, ६४ आणि ६८ या छायांकित प्रती सोबत जोडत आहोत.

कृपया हे पत्र मिळाल्याची पोच द्यावी.

आपला स्नेहांकित,

(डॉ. अजय प्र. देशमुख)
कुलसचिव